# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे – १७

मा. ड प्रभाग समिती,

कार्यपत्रिका क्र. ५

सभावृत्तांत

दिनांक ०३/०८/२०१८ दुपारी १२.०० वा.

पिपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची माहे ऑगस्ट २०१८ ची नियमित मासिक सभा शुक्रवार दिनांक ०३/०८/२०१८ रोजी दुपारी १२.०० वा. ड क्षेत्रिय कार्यालयाच्या " छत्रपती शाहू महाराज सभागृह" येथे आयोजीत करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. कदम शशिकांत गणपत | सभापती |
| २) | मा. श्रीमती वाघमारे अश्विनी विक्रम | सदस्या |
| ३) | मा. श्रीमती दर्शले रेखा राजेश | सदस्या |
| ४) | मा. श्री. कलाटे राहुल तानाजी | सदस्य |
| ५) | मा. श्री. कलाटे मयुर पांडुरंग | सदस्य |
| ६) | मा. श्रीमती चोंधे आरती सुरेश | सदस्या |
| ७) | मा. श्री. कस्पटे संदिप अरुण | सदस्य |
| ८) | मा. श्रीमती कुटे निर्मला संजय | सदस्या |
| ९) | मा. श्री. काटे विठ्ठल उर्फ नाना कृष्णाजी | सदस्य |
| १०) | मा. श्री. आंगोळकर सागर सुनिल | सदस्य |
| ११) | मा. श्रीमती मुंढे उषा अंकुश | सदस्या |
| १२) | मा. श्रीमती लोखंडे चंदा राजू | सदस्या |

------------

तसेच खालीलप्रमाणे नामनिर्देशित सदस्य बैठकीस उपस्थित होते.

१) मा. श्री. नखाते संदीप भानुदास

याशिवाय सभेस मा. विजय खोराटे, क्षेत्रिय अधिकारी, मा. मा.सिताराम बहुरे,प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभा शाखा, मा. देवण्णा गट्टुवार, कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा.बाबासाहेब गलबले, कार्यकारी अभियंता विद्युत, मा. रामदास तांबे, कार्यकारी अभियंता, ग्रॅव्हिटी, मा. विनोद बेंडाळे, सहा. आरोग्याधिकारी, मा. संध्या वाघ, मा. व्ही.एन. देसले, मा. एस.वाय. पाटील, उपअभियंता, स्थापत्य, मा. भाउसाहेब साबळे, उपअभियंता पाणीपुरवठा, मा. माधव

सोनवणे, उपअभियंता, विद्युत, मा. सुर्यकांत मोहिते, उपअभियंता, जलनि:सारण, मा. नरोटे सुनिलदत्त, उपअभियंता, स्था. उद्यान, मा. हरदास सुनिल, उपअभियंता, झोनिपू स्थापत्य, मा. लागू ए.ए. प्र. लेखाधिकारी, मा. एस.एस. गायकवाड, मुख्य आरोग्य निरीक्षक, मा. खोत एस.एच., मा. कदम वर्षा,कनिष्ठ अभियंता, स्थापत्य, मा. भालेराव सी. डी., मा. कावळे महेश, कनिष्ठ अभियंता विद्युत, मा. धुमाळ प्रवीण, मा. एस.यु. कुतवळ, कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा, मा. रोकडे जयवंत बी., मा. मुलाणी बी.एम. कनिष्ठ अभियंता जलनि:सारण, मा. मोरे बी.जे. कनिष्ठ अभियंता, स्था. उद्यान, मा. गेंगजे विश्वास, क्रीडा निरीक्षक, मा. सोनवणे अतुल, मा. मोरे शशिकांत, मा. सौदाई आर. एम., मा.कोतवडेकर संदीप, आरोग्य निरीक्षक, मा. पटेल जे.व्ही., उद्यान निरीक्षक, मा. माडे आर.एस. कार्यालय अधिक्षक, अतिक्रमण विभाग, मा. खैरे जी.एन. उद्यान सहाय्यक, इ. अधिकारी उपस्थित होते.

-----------

**प्रशासन अधिकारी तथा सचिव** : माहे ऑगस्ट २०१८ ची नियमित मासिक सभा दि. ०३/०८/२०१८ रोजीचे कामकाज सुरु करण्यास मान्यता मिळावी.

**मा.सभापती** : आजच्या सभेचे कामकाज सुरु करण्यात मान्यता देणेत येत आहे.

**मा. राहुल कलाटे** : सन्मा. सदस्य श्री. तुषार कामठे यांच्या आजी श्रीमती इंदुमती निवृत्ती कामठे यांचे तसेच माजी नगरसदस्य श्री. प्रशांत कृष्णराव शितोळे यांच्या मातुश्री श्रीमती मंदाकिनी कृष्णराव शितोळे यांचे वृध्दापकाळाने दु:खद निधन झालेचे कारणास्तव तसेच मराठा आरक्षण आंदोलनात बळी गेलेले काकासाहेब शिंदे यांचे निधन झालेचे कारणास्तव सर्व उपस्थितांनी दोन मिनिटे उभे राहुन श्रध्दांजली वाहण्यात यावी अशी सूचना मांडतो.

**मा. आरती चोंधे** : सदर सूचनेस अनुमोदन देते.

**मा. सभापती** : सदर प्रस्तावास मान्यता देतो.

सन्मा. सदस्यांनी मांडलेल्या सूचनेनुसार सभागृहात उपस्थित सर्व सन्मा. सदस्य, अधिकारी व कर्मचारी यांनी सन्मा. सदस्य श्री. तुषार कामठे यांच्या आजी श्रीमती इंदुमती निवृत्ती कामठे यांचे तसेच माजी नगरसदस्य श्री. प्रशांत कृष्णराव शितोळे यांच्या मातुश्री श्रीमती मंदाकिनी कृष्णराव शितोळे यांचे वृध्दापकाळाने दु:खद निधन झालेचे कारणास्तव तसेच मराठा आरक्षण आंदोलनात बळी गेलेले काकासाहेब शिंदे यांचे निधन झालेचे कारणास्तव सर्व उपस्थितांनी दोन मिनिटे उभे राहुन श्रध्दांजली वाहिली.

तदनंतर माहे ऑगस्ट २०१८ च्या सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

**मा. सचिव, सभा शाखा** :- सन्मा. सदस्यांनी सादर केलेले ऐन वेळचे विषय दाखल करुन घेणेकामी मान्यता मिळावी.

**मा. सभापती** :– सन्मा. सदस्यांनी सादर केलेले ऐन वेळचे विषय दाखल करुन घेणेत येणेकामी मान्यता आहे.

**सन्मा. सदस्यांच्या मागणीप्रमाणे व  मा. सभापती यांचे मान्यतेने सभेमध्ये खालील प्रमाणे ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेत आले.**

**विषय क्र. १** :- प्रभाग क्र. २५ पुनावळे येथील सर्व्हे नं. २७,२८,२९ मध्ये मनपा मार्फत १८.०० मीटर रुंद डी.पी. रस्ता विकसित करणेत आलेला आहे. सदर रस्त्याने बाधित स्थानिक शेतकरी यांनी आपल्या जमिनी मनपास रस्ता विकसित करणेकामी दिलेल्या असुन त्यांची व इतर ग्रामस्थांची हरकत नाही. तरी सदर रस्त्यास "वै. संजय सोपानराव गायकवाड पथ" असे नामकरण करणेच्या प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत

**विषय क्र.** २ :- मौजे ताथवडे स.नं. १३४ मधील नागरीकांना सद्यस्थितीत जाणे येणेसाठी कुठलाही रस्ता अस्तित्वात नाही. त्यामुळे स.नं. १३४ मधील नागरीकांच्या सोयीसाठी सद्यस्थितीत अस्तित्वात असलेल्या व मुंबई बेंगलोर बाहयवळण मार्गापासुन सुरु होऊन जीवननगर मार्गे ताथवडे गावठाणापर्यंत जाणा-या व ई.पी. १६ अन्वये १८ मीटर प्रस्तावित रस्त्यापासुन स.नं. १३५ च्या हद्दीलगत उत्तर दक्षिण स.नं. १३४ पर्यंत ९.०० मीटर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २०५ अन्वये घोषित करणेस व विहीत कार्यवाही पूर्ण करणेस व या कामी सर्व अधिकार मा. आयुक्त यांना देणेबाबतचे प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत

**विषय क्र.** ३ :- प्रभाग क्र. २६ मधील शारदा कॉलनीमध्ये देवांग कोष्टी समाज पुणे व पिंपरी चिंचवड यांचे देवांग होस्टेल असुन येथे गरीब विद्यार्थ्यांना सवलतीच्या दरात निवासाची सोय केली जाते. तरी या होस्टेलकडे जाणारा दिशादर्शक फलक "देवांग कोष्टी समाज पुणे व पिंपरी चिंचवड परिसर देवांग होस्टेल कडे" या प्रमाणे एक रक्षक चौकात व दुसरा होस्टेल जवळील मुख्य रस्त्यावर लावणेबाबतचे प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत

**विषय क्र.** ४ :- प्रभाग क्र. २६ मधील चोंधे लॉन्स जवळील नदीवरील कै. शकुंतला बबन साठे माऊली घाट पावसामुळे ब-याच ठिकाणी मोठया प्रमाणात खराब झालेला आहे तसेच या घाटावर गणेशोत्सव काळात गणपती विसर्जनासाठी मोठया प्रमाणात प्रभागातील नागरीकांची गर्दी असते तसेच येत्या काही दिवसातच गणेशोत्सव येत आहे व त्यामुळे सदरील घाटावर दुरुस्ती व डागडुजी करणे अत्यंत आवश्यक आहे त्यामुळे सदरील घाटाची दुरुस्ती व डागडुजी लवकरात लवकर करणे बाबतचे प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत

**विषय क्र.** ५ :- प्रभाग क्र. २९ पिंपळे गुरव वैदुवस्ती भागातील भगतसिंग चौक ते कल्पतरु १२ मीटर रुंद रस्त्याजवळील असलेले मनपाचे १८ सिट्सचे दोन ब्लॉकचे शौचालय पाडून त्याठिकाणी वैदू समाजातील नागरीकांसाठी बैठक व्यवस्था करणेत यावी. सदर भागात स्वच्छ भारत अभियानातुन तरंगत्या लोकसंख्येसाठी सृष्टी चौकात ई-टॉयलेट बांधणेत येणार आहे. तसेच या पूर्वीचा दि.

२/२/२०१८ चा ठराव क्र. १३ विखंडीत करुन वैदुवस्ती ग्राऊंड बाजूचे १२ सिट्सचे खेळणी शौचालय पाडून त्या ठिकाणी पुरुष ४ व स्त्री ४ सिट्सचे नवीन अद्ययावत शौचालय बांधणेबाबतचे प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत

**विषय क्र.** ६ :- स्मार्ट सिटी योजनेंतर्गत ड प्रभाग कार्यक्षेत्रात जी कामे करण्यात येत आहेत त्याची माहिती त्या सर्व प्रभागांच्या सदस्यांना अद्याप पर्यंत देणेत आलेली नाही. मा. स्थायी समितीमध्ये सदर विषयास मान्यता देणेत आली आहे परंतु प्रभाग स्तरावरील सर्व सदस्यांना या प्रकल्पाची माहिती देणेत येऊन प्रभाग समितीच्या मान्यतेने सदर विषय मा. महापालिका सभेसमोर घेणेबाबतचे प्रस्तावास मान्यता मिळणेबाबत.

**मा. सचिव, सभा शाखा** :- मागील प्रभाग सभा कार्यपत्रिका क्र. २,३,४ माहे मे २०१८, माहे जुन २०१८ व माहे जुलै २०१८ चे सभावृत्तांत कायम करणे

मा. सभापती : :- मागील प्रभाग सभा कार्यपत्रिका क्र. २,३,४ माहे मे २०१८, माहे जुन २०१८ व माहे जुलै २०१८ चे सभावृत्तांत कायम करण्यास मान्यता देणेत येत आहे.

तदनंतर माहे ऑगस्ट २०१८ च्या विषयपत्रिकेवरील विषयांवर खालीलप्रमाणे मान्यता देणेत आली.

विषय क्र. १ ठराव क्र. ६

दिनांक : ०३/०८/२०१८ विभाग – स्थापत्य विभाग

सुचक : मा. संदीप अरुण कस्पटे अनुमोदक : मा. आरती सुरेश चोंधे

संदर्भ : सन्मा. सदस्य श्री. संदीप अरुण कस्पटे यांचा दि. ०५/०७/२०१८ रोजीचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड मनपा (प्रभाग क्र. २६ वाकड-पिंपळे निलख) मौजे वाकड सर्व्हे नं. २२८ अँबिएन्स हॉटेल , अन्नपूर्णा हॉटेल रोड, कस्पटे वस्ती येथील दोन कॉलनीला १) मंगल मुर्ती पार्क २) दुर्वांकुर पार्क हे नाव देणेबाबतचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

--------------

विषय क्र. २ ठराव क्र. ७

दिनांक : ०३/०८/२०१८ विभाग – स्थापत्य विभाग

सुचक : मा. संदीप अरुण कस्पटे अनुमोदक : मा. आरती सुरेश चोंधे

संदर्भ : सन्मा. सदस्य श्री. संदीप अरुण कस्पटे यांचा दि. ०५/०७/२०१८ रोजीचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड मनपा (प्रभाग क्र. २६ वाकड-पिंपळे निलख) मौजे वाकड सर्व्हे नं. १९३/२/२/३, दत्त मंदिर जवळील वाकड रोड शेजारील “२” गल्लीस (१) “भाऊसाहेब कलाटे नगर १” व (२) “ भाऊसाहेब कलाटे नगर २” असे नाव देणेबाबतचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------------

विषय क्र. ३ ठराव क्र. ८

दिनांक : ०३/०८/२०१८ विभाग – नगररचना विभाग

सुचक : मा.विठ्ठल उर्फ नाना काटे अनुमोदक : मा. सौ. शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

संदर्भ : सन्मा. सदस्य श्री. विठ्ठल उर्फ नाना कृष्णाजी काटे यांचा दि. २१/०७/२०१८ रोजीचा प्रस्ताव

पिंपळे सौदागर येथील गोविंद यशदा चौक ते विश्वशांती कॉलनी पर्यंत रिंग रेल्वेचे स्टेशन साठी आरक्षित असलेल्या जागेत ज्याप्रमाणे कोकणे चौक ते काळेवाडी फाटा दरम्यान रस्ता विकसित करण्यासाठी २८ कोटी मंजूर करण्यात आले आहेत. हा रस्ता ३० मीटर विकसित करण्यात येणार असुन मुख्य रस्त्याला लागून ९.०० मीटरचा रस्ता विकसित करण्यात येणार आहे. त्याच धर्तीवर पिंपळे सौदागर येथील गोविंद यशदा चौक ते विश्वशांती कॉलनीपर्यंत लिनियर गार्डनलगत रिंग रेल्वेचे स्टेशनसाठी आरक्षित असलेल्या आरक्षण क्र. ३७१, स.नं. ७०ते ७२,१४४ ते १४६,१४९ पै. जागेत ९.०० मीटर चा रस्ता विकसित करणेबाबतचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

---------------

**तदनंतर सन्मा.** सदस्यांनी सादर केलेले व सन्मा. सभापती यांनी दाखल करुन घेतलेल्या ऐन वेळचे विषयांवर खालीलप्रमाणे मान्यता देणेत आली.

विषय क्र. ४ ठराव क्र. ९

दिनांक : ०३/०८/२०१८ विभाग – स्थापत्य विभाग

सुचक : मा. सौ. रेखा राजेश दर्शले अनुमोदक : मा. सौ. अश्विनी विक्रम वाघमारे

संदर्भ : सन्मा. सदस्या मा. सौ. रेखा राजेश दर्शले यांचा दि. ३/०८/२०१८ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. २५ पुनावळे येथील सर्व्हे नं. २७,२८,२९ मध्ये मनपा मार्फत १८.०० मीटर रुंद डी.पी. रस्ता विकसित करणेत आलेला आहे. सदर रस्त्याने बाधित स्थानिक शेतकरी यांनी आपल्या जमिनी मनपास रस्ता विकसित करणेकामी दिलेल्या असुन त्यांची व इतर ग्रामस्थांची हरकत नाही.

तरी सदर रस्त्यास “वै. संजय सोपानराव गायकवाड” पथ असे नामकरण करणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

-------------

विषय क्र. ५ ठराव क्र. १०

दिनांक : ०३/०८/२०१८ विभाग – नगररचना विभाग

सुचक : मा. श्री. मयुर पांडुरंग कलाटे अनुमोदक : मा. सौ. अश्विनी विक्रम वाघमारे

संदर्भ : सन्मा.सदस्य मा. श्री. मयुर पांडुरंग कलाटे यांचा दि. ०३/०८/२०१८ रोजीचा प्रस्ताव

मौजे ताथवडे स.नं. १३४ मधील नागरीकांना सद्यस्थितीत जाणे येणेसाठी कुठलाही रस्ता अस्तित्वात नाही. त्यामुळे स.नं. १३४ मधील नागरीकांच्या सोयीसाठी सद्यस्थितीत अस्तित्वात असलेल्या व मुंबई बेंगलोर बाहयवळण मार्गापासुन सुरु होऊन जीवननगर मार्गे ताथवडे गावठाणापर्यंत जाणा-या व ई.पी. १६ अन्वये १८ मीटर प्रस्तावित रस्त्यापासुन स.नं. १३५ च्या हद्दीलगत उत्तर दक्षिण स.नं. १३४ पर्यंत ९.०० मीटर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २०५ अन्वये घोषित करणेस व विहीत कार्यवाही पूर्ण करणेस व या कामी सर्व अधिकार मा. आयुक्त यांना देणेबाबतचे प्रस्तावावर चर्चा झाली. सदर विषय पुढील प्रभाग समिती बैठकीचे वेळी विषयपत्रिकेवर घेणेत यावा असे मा. सभापती यांनी सुचित केले.

सदर प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

--------------

विषय क्र. ६ ठराव क्र. ११

दिनांक : ०३/०८/२०१८ विभाग – स्थापत्य विभाग

सुचक : मा. श्रीमती आरती सुरेश चोंधे अनुमोदक : मा. श्री. संदीप अरुण कस्पटे

संदर्भ : सन्मा.सदस्या श्रीमती आरती सुरेश चोंधे यांचा दि. ०३/०८/२०१८ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. २६ मधील शारदा कॉलनीमध्ये देवांग कोष्टी समाज पुणे व पिंपरी चिंचवड यांचे देवांग होस्टेल असुन येथे गरीब विद्यार्थ्यांना सवलतीच्या दरात निवासाची सोय केली जाते. तरी या होस्टेलकडे जाणारा दिशादर्शक फलक “देवांग कोष्टी समाज पुणे व पिंपरी चिंचवड परिसर देवांग होस्टेल कडे” या प्रमाणे एक रक्षक चौकात व दुसरा होस्टेल जवळील मुख्य रस्त्यावर लावणेबाबतचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

----------------

विषय क्र. ७ ठराव क्र. १२

दिनांक : ०३/०८/२०१८ विभाग – स्थापत्य विभाग

सुचक : मा. श्रीमती आरती सुरेश चोंधे अनुमोदक : मा. श्री. संदीप अरुण कस्पटे

संदर्भ : सन्मा.सदस्या श्रीमती आरती सुरेश चोंधे यांचा दि. ०३/०८/२०१८ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. २६ मधील चोंधे लॉन्स जवळील नदीवरील कै. शकुंतला बबन साठे माऊली घाट पावसामुळे ब-याच ठिकाणी मोठया प्रमाणात खराब झालेला आहे तसेच या घाटावर गणेशोत्सव काळात गणपती विसर्जनासाठी मोठया प्रमाणात प्रभागातील नागरीकांची गर्दी असते तसेच येत्या काही दिवसातच गणेशोत्सव येत आहे व त्यामुळे सदरील घाटावर दुरुस्ती व डागडुजी करणे अत्यंत आवश्यक आहे त्यामुळे सदरील घाटाची दुरुस्ती व डागडुजी लवकरात लवकर करणे बाबतचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

--------------

विषय क्र. ८ ठराव क्र. १३

दिनांक : ०३/०८/२०१८ विभाग – स्थापत्य विभाग

सुचक : मा. सौ. चंदा राजू लोखंडे अनुमोदक : मा. सौ. उषा अंकुश मुंढे

संदर्भ : सन्मा.सदस्या सौ. चंदा राजू लोखंडे यांचा दि. ०३/०८/२०१८ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. २९ पिंपळे गुरव वैदुवस्ती भागातील भगतसिंग चौक ते कल्पतरु १२ मीटर रुंद रस्त्याजवळील असलेले मनपाचे १८ सिट्सचे दोन ब्लॉकचे शौचालय पाडून त्याठिकाणी वैदू समाजातील नागरीकांसाठी बैठक व्यवस्था करणेत यावी. सदर भागात स्वच्छ भारत अभियानातुन तरंगत्या लोकसंख्येसाठी सृष्टी चौकात ई-टॉयलेट बांधणेत येणार आहे. तसेच या पूर्वीचा दि. २/२/२०१८ चा ठराव क्र. १३ विखंडीत करुन वैदुवस्ती ग्राऊंड बाजूचे १२ सिट्सचे खेळणी शौचालय पाडून त्या ठिकाणी पुरुष ४ व स्त्री ४ सिट्सचे नवीन अद्ययावत शौचालय बांधणेबाबतचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

-------------------

विषय क्र. ९ ठराव क्र. १४

दिनांक : ०३/०८/२०१८ विभाग – स्थापत्य मुख्य कार्यालय

सुचक : मा.श्री. राहुल कलाटे अनुमोदक : मा. श्री. विठ्ठल उर्फ नाना काटे

संदर्भ : सन्मा.सदस्य श्री. राहुल कलाटे यांचा दि. ०३/०८/२०१८ रोजीचा प्रस्ताव

स्मार्ट सिटी योजनेंतर्गत ड प्रभाग कार्यक्षेत्रात जी कामे करण्यात येत आहेत त्याची माहिती त्या सर्व प्रभागांच्या सदस्यांना अद्याप पर्यंत देणेत आलेली नाही. स्मार्ट सिटी ही स्वायत्त संस्था असतानाही मा. स्थायी समितीमध्ये ज्याप्रमाणे काही विषय मान्यतेकामी घेतले होते त्याप्रमाणे स्मार्ट सिटीची जी कामे प्रभागांतर्गत करण्यात येतात त्यांची माहिती संबंधित प्रभागातील स्थानिक सदस्यांना होण्याच्या दृष्टीकोनातुन सदर प्रस्ताव ड प्रभाग समिती मार्फत मा. महापालिका सभेसमोर घेणेबाबतचे धोरणास मान्यतेकरीता ड प्रभाग समिती मार्फत महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------------

मा. सभापती : ड प्रभाग समिती सभेमध्ये झालेल्या विविध विषयावर चर्चा होऊन सर्व उपस्थितांचे आभार मानुन माहे ऑगस्ट २०१८ ची सभा संपली असे जाहीर करतो.

सही/-
(कदम शशिकांत गणपत)
**सभापती,**
ड प्रभाग समिती,
ड क्षेत्रीय कार्यालय, रहाटणी – १७

सही/-
(सीताराम बहुरे)
**प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)**
ड प्रभाग समिती

क्रमांक – ड/१३/कावि/१४५/२०१८
दिनांक –०७ /०९/२०१८